**विद्यापीठ मध्यवर्ती परिसर येथे राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत "Establishment of Model Genome Club for sustainable Agriculture Devlopment" या प्रकल्पाबाबत.**

---

**सन २०२४-२५ ते २०२५-२६**

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
## राहुरी, जि. अहिल्यानगर

---o0o---

**विद्यापीठ निर्णय जा.क्र.एमटीजी - ३(७२७)/२२८ /२०२५,** **दि.१९/१२/२०२५**

**संदर्भ: -** १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शा.नि.मफुकृवि-१४२३ /प्र.क्र.३०/७-अे दि. २१ फेब्रुवारी २०२३.

२. विद्यापीठ निर्णय जा.क्र.एमटीजी-३ (७२७)/२१३/२०२३, दि.१४/०७/२०२३

३. जा.क्र.कृआ/कृप्रवनि/राकृवियो/टि-०१/०२३/भाग-४-२/३३१९८/२०२३, दि.१६/१०/२०२३

४.जा.क्र.कृआ/राकृवियो/टि-१/०२३/भाग-५/र-२२७/२०२४-२५, दि.०१/०८/२०२४

५.जा.क्र.कृआ/राकृवियो/टि-१/०२३/भाग-५/र-२७०/२०२४-२५, दि.०६/११/२०२४

६.जा.क्र.कृआ/राकृवियो/टि-१/०२३/भाग-५/र-२१/२०२४-२५, दि.११/०२/२०२५

७.जा.क्र.कृआ/राकृवियो/टि-१/०२३/भाग-५/र-२००/२०२५-२६, दि.०९/०६/२०२५

८.कार्यकारी परिषदेच्या ३४५ व्या बैठकीतील ठराव क्र.३९/का.प.बै.३४५ (दि.२४/०८/२०२५)

९. प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग,मफुकृवि, राहुरी यांचे पत्र क्र.जा.क्र.कृवशावि/मॉजिक्ल/ वि.नि./१८२७/२०२५, दिनांक-२५.०९.२०२५

**पार्श्वभूमी:-**

लोक सहभागातून पिकांच्या स्थानीक वाणांचे संवर्धन आणि व्यवस्थापन करणे तसेच जैवविविधता संवर्धन करणाऱ्या स्थानिक शेतकरी / समुदायांच्या बळकटीसाठी व "शाश्वत शेतीकरीता मॉडेल जिनोम क्लब" ची स्थापना संदर्भ क्र. २ नुसार २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांसाठी करण्यात आली होती. परंतु २०२२-२३ मध्ये निधी प्राप्त झाला नसल्यामुळे प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात चालु झाले नाही. २०२३-२४ मध्ये संदर्भ क्र. ३ नुसार रु.२५.०० लाख निधी प्राप्त झाला, २०२४-२५ मध्ये संदर्भ क्र. ४ ते ६ नुसार रु.८.३३ लाख एवढा निधी प्राप्त झाला व २०२५-२६ मध्ये संदर्भ क्र. ७ नुसार रु.४.९० लाख एवढा निधी प्राप्त झाला असून शिल्लक निधी रु.५.६७ लाख लवकरच उपलब्ध होणार आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेकडुन सदरील निधी लवकरात लवकर खर्च करण्याचे आदेश देण्यात आले आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेकडुन निधीची पुर्तता विहित कालावधी मध्ये झाली नसल्यामुळे प्रकल्पाचे मुळ उद्दिष्ट साध्य झाले नाही. सन २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये प्रकल्पाचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आराखडा तयार असून प्रकल्प कार्यान्वयीत राहणे आवश्यक आहे.

**विद्यापीठ निर्णय :-**

कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, मध्यवर्ती परिसर, म.फु.कृ.वि., राहुरी येथे मॉडेल जिनोम क्लब या प्रकल्पास संदर्भ क्र. १ अन्वये रु.४३.९० लाख रक्कमेस मंजूरी प्रदान करण्यात आलेली होती. रा.कृ.वि. योजनेअंतर्गत

रु.४३.९० लाख अर्थसहाय्यचा "Establishment of Model Genome Club for sustainable Agricultural Development" हा उपरोक्त संदर्भीय प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राबविण्यास संदर्भ क्र.२ नुसार २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. विहीत कालावधीमध्ये सदरील प्रकल्पाचा मुळ उद्देश साध्य झाला नाही. तो उद्देश साध्य होण्यासाठी संदर्भ क्र. ८ नुसार महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील कलम ३१ (८) व ३१ (१०) अन्वये शिल्लक निधीपैकी रु. १८.९० लाख अखर्चीत निधी प्रकल्पाचे उद्दिष्टे पुर्तीसाठी सन २०२४-२५ ते २०२५-२६ या दोन वर्षाच्या कालावधीत खर्च करण्यास मान्यता प्रदान केली.

उपलब्ध खर्चाकरिता निधी उपलब्धतेचा तपशील व कंत्राटी मनुष्यबळाचा तपशील परिशिष्ठ-अ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

सदर मॉडेल जिनोम क्लबसाठी प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी हे मुख्य समन्वयक तर प्रभारी अधिकारी, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प, व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, म.फु.कृ.वि., राहुरी हे सह-समन्वयक म्हणुन काम पाहतील. प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी यांच्याकडे या प्रकल्पाचे प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रण राहील व ते आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन काम पाहतील. तसेच संपूर्ण नियंत्रण संचालक संशोधन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडे असेल.

विहीत सर्व निकषांन्वये अंमलबजावणीचे तटस्थ वार्षिक मूल्यमापन संचालक (संशोधन), मफुकृवि, राहुरी व संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे स्तरावरुन करण्यात यावे व तसा मुल्यमापन तथा फलनिष्पत्तीचा वार्षिक अहवाल मा. कुलगुरु महोदय यांना दरवर्षी सादर व्हावा.

सदरचा विद्यापीठ निर्णय नियंत्रक, म.फु.कृ.वि., राहुरी यांचे अनौपचारीक संदर्भ क्र. १४६२ व्हीसी. दि. २४.११.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
**राजेंद्रकुमार पाटील**
**कुलसचिव**

**प्रत माहिती व कार्यावाहीस्तव-**

१. सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मादाम काम रोड, हुतात्मा राजगुरु चौक, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०३२.
२. संचालक (संशोधन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११ ००७.
३. संचालक, विस्तार शिक्षण/संशोधन/ शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
४. अधिष्ठाता (कृषि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
५. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)
६. विभाग प्रमुख (सर्व)
७. सहयोगी संशोधन संचालक (सर्व)
८. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व)
९. प्रभारी, कृषि संशोधन केंद्र/ प्रकल्प (सर्व)
१०. विद्यापीठ ग्रंथपाल/ नियोजन अधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
११. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
१२. उप कुलसचिव (प्रशासन)/ (विद्या), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
१३. अधिदान व लेखाधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
१४. मा. कुलगुरु/ कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

**उप-कुलसचिव (प्रशासन)**
**मफुकृवि, राहुरी**

# परिशिष्ठ - अ

"Establishment of Model Genome Club for Sustainable Agricultural Development"

मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**निधी उपलब्धतेचा तपशील (सन २०२४-२५ व २०२५-२६)**

| तपशील | सन २०२४-२५ (एकुण किंमत) | सन २०२५-२६ (एकुण किंमत) | प्रकल्प एकुण किंमत | रा.कृ.वि.यो अंतर्गत प्रकल्पास मंजूर निधी (१००%) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ (२+३) | ५ |
| **अ) अनावर्ती निधी (उपकरणे व मालमत्ता)** | | | | |
| १) संगणक (मल्टीमिडिया) (०२) | - | - | - | - |
| २) एलसीडी प्रोजेक्टर (०१) | - | - | - | - |
| ३) इंटरएक्टिव्ह इलेक्ट्रॉनिक बोर्ड (०२) | - | - | - | - |
| ४) डिस्प्ले पॅनेल/ बोर्ड (१०-१५) | - | - | - | - |
| ५) फर्निचर आणि फिक्स्चर | - | - | - | - |
| ६) रेफ्रिजरेटर, टीव्ही, वॉटर कुलर (प्रत्येकी ०१) | - | - | - | - |
| **एकुण (अ)** | **-** | **-** | **-** | **-** |
| **ब) आवर्ती निधी** | | | | |
| १) प्रोजेक्ट असोसिएट- ०२ (रु. २०,०००/प्रत्येकी महिना) | ४,८०,००० | ४,८०,००० | ९,६०,००० | ९,६०,००० |
| २) तांत्रिक मदतनीस - ०२ (रु. १०,०००/प्रत्येकी महिना) | २,४०,००० | २,४०,००० | ४,८०,००० | ४,८०,००० |
| ३) विविध कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ऑपरेशनल खर्च व इतर विधि खर्च इ. | ६३,००० | ५,५९,०८६ | ६,२२,०८६ | ६,२२,०८६ |
| ४) प्रशिक्षक आणि तज्ञांसाठी प्रवास खर्च, शेतकरी/ समाजासाठी मानधन आणि सन्मान पुरस्कार | ५०,००० | ५०,००० | १,००,००० | १,००,००० |
| **एकुण (ब)** | **८,३३,०००** | **१३,२९,०८६** | **२१,६२,०८६** | **२१,६२,०८६** |
| **एकुण (अ+ब)** | **८,३३,०००** | **१३,२९,०८६** | **२१,६२,०८६** | **२१,६२,०८६** |
| **एकुण निधी - रु. २१,६२,०८६ लक्ष (अक्षरी रूपये एकवीस लाख बासष्ठ हजार शहाऐंशी फक्त)** | | | | |

उप-कुलसचिव (प्रशासन)
मफुकृवि, राहुरी